मुळ बी.पी/रहाटणी/४६/२०१६ दि. १८/०५/२०१६ ला सुधारित
टोकन क्र. १०४३२५१६००० ८८९५

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८.

(यापुढील पत्र व्यवहारात खालील क्रमांक व दिनांक यांचा उल्लेख करावा.)
(जागेच्या वा इमारतीच्या कायदेशीर मालकी हक्कांचे संदर्भ लक्षात न घेता अर्जदारास हे संमतीपत्र देण्यात येत आहे.)
(कमेन्समेंट सर्टिफिकेट)

## बांधकाम चालू करणेकरिता दाखला

सदर बांधकाम चालू करण्याचा दाखला आणि बांधकामाचे संमतीपत्र महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ ची कलम ४५ यातील तरतुदीप्रमाणे आणि महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलमे (सेक्शन्स) २५३ व २५४ यातील तरतुदीप्रमाणे खालील अटींवर देण्यात येत आहे.

पिंपरी – चिंचवड महानगरपालिका स्थापना ११/१०/८२ पिंपरी-४११०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.
क्रमांक – बी. पी. /रहाटणी/०४/२०१७
दिनांक : १०/ ०१ / २०१७

श्री / श्रीमती / मे.श्री. बी.सी. सलगरे व सौ. एम.बी. सलगरे द्वारा : ला. आ. / ला. स. श्री. मेहुल शहा तर्फे (कु.मु.धा.) ब्लु प्रॉपर्टीज तर्फे भागीदार पत्ता : ०८, वाल्मिकी को.हौ. सोसा. श्री. निक्की नरेश वासवाणी रहाटणी, पुणे - ०४ यांना

पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांजकडून

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलमे ४५ आणि महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलमे (सेक्शन्स) २५३ व २५४ अन्वये पिंपरी–चिंचवड महानगरपालिकेच्या सीमेतील मौजे – येथील सर्व्हे नं. ९९/१/७/१ व ९९/१/७/८ सिटी सर्व्हे नं. ९८८१(पै) ९८८२(पै) प्लॉट नं. – मधील बांधकाम करण्यासाठी तुम्ही महानगरपालिकेला हा अर्ज दाखल केला तो दिनांक ०७ / १२ / २०१६ रोजी प्राप्त झाला. त्यावरून बांधकाम करण्यास खाली लिहिलेल्या अटींवर व जादा अट क्र. २९ ते ३२ नुसार तुम्हास संमतीपत्र देण्यात येत आहे.

१) सोबतच्या नकाशात दाखविल्याप्रमाणे काम केले पाहिजे.

२) संकल्पित बांधकाम रस्त्याच्या प्रमाण रेषेत येत असल्यास महानगरपालिकेचे अधिकारी सांगतील त्या वेळी सदर काम स्वखर्चाने आणि बिनतक्रार काढून टाकले पाहिजे.

३) जोत्यापर्यंत काम झाल्यानंतर सेट–बॅक नगर नगररचना विकास विभागाकडून तपासून घ्यावेत. त्याशिवाय जो त्यावरील काम सुरू करु नये.

४) सोबतच्या नकाशावर मागे लिहिलेल्या / अटींवर हे संमतीपत्र देण्यात येत आहे.

५) ज्या प्लॉटवर नवीन इमारत बांधकाम करण्यात आले आहे, त्या इमारतीचे कंप्लीशन सर्टिफिकेट मागण्यापूर्वी प्रत्येक मालकाने इमारतीसमोर कंपाउंट वॉलच्या आत व बाहेर झाडे लावून ती व्यवस्थित वाढविण्याच्या दृष्टीने योग्य ती व्यवस्था, खबरदारी घ्यावी त्याशिवाय कंप्लीशन सर्टिफिकेट मिळणार नाही. रस्त्यावरील झाडांना जरूर ते संरक्षण कुंपण अर्जदाराने करावयाचे आहे. तसेच महानगरपालिकेच्या प्रचलित नियमानुसार योग्य ती अनामत रक्कम कोषागारात भरणे बंधनकारक आहे.

६) इमारतीचे कंप्लीशन सर्टिफिकेट देतांना रस्त्यावरील व आतील बाजूस टाकण्यात आलेले इमारतीचा राडारोडा उचलून जागा साफ केल्याशिवाय अर्जाचा विचार केला जाणार नाही.

७) नवीन बांधकाम सुरू करताना संबंधित जागेमध्ये झाडे असल्यास ती ट्री ॲथॉरिटीची पूर्वपरवानगी घेतल्याशिवाय तोडू नयेत अन्यथा कायदेशीर कारवाई करण्यात येते, याची नोंद घ्यावी.

८) आपण संबंधित बांधकाम हे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम व महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ मधील तरतुदीचा भंग करून सक्षम अधिकाऱ्याची पूर्व परवानगी न घेता सुरु केल्याबद्दल / तसेच इकडील मंजूर नकाशाप्रमाणे बांधकाम न करता त्यात बदल व फेरफार करुन या बांधकामाचे सुधारित नकाशास पूर्व परवानगी न घेता बांधकाम केल्याबद्दल, इमारतीचे भोगवटा पत्रक न घेता भोगवटा केल्याबद्दल आपणाविरुद्ध वरील नियमानुसार दंडात्मक कार्यवाही करण्याचा पि.चिं.म.न.पा. चा हक्क राखून ठेवला आहे.

९) बांधकाम साहित्य अथवा जुन्या बांधकामाचा निघालेला राडारोडा सार्वजनिक रस्त्यावर म.न.पा.चे परवानगी शिवाय ठेवता येणार नाही जर हे साहित्य सार्वजनिक ठेवल्याचे आढळल्यास त्यासाठी सुधारित विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीनुसार निवासी वापरासाठी रु. २५/– वाणिज्य वापरासाठी रु. ५०/– प्रति चौ. मी. प्रमाणे प्रति सप्ताहासाठी दंड आकारण्यात येईल.

१०) आपल्या इमारतीचे सांडपाणी नलिका म.न.पा. ड्रेनेज नलिकेला मालकाने स्वखर्चाने जोडणे आवश्यक आहे.

~~टोकन क्र. १०४३२५१६०००८८९५~~

११) भूखंडधारकाने / प्रमोटर / बिल्डरने / ठेकेदाराने अथवा प्रकल्प बांधकाम करणाऱ्याने नियोजित निवासी / व्यापारी गाळे धारकांच्या यापुढे येणाऱ्या कोणत्याही तक्रारीस म.न.पा. जबाबदार राहणार नाही. असे प्रतिज्ञापत्र (स्पेशल एक्झिक्युटिव्ह मॅजिस्ट्रेट यांचे स्वाक्षरीचे) सदर इमारतीचा पुर्णत्वाचा दाखला घेणेपूर्वी म.न.पा. कडे सादर करावे. पाणी पुरवठा, जलनि:सारण, उद्यान, अग्निशामक आवश्यक विभागाचे ना हरकत दाखले इकडे सादर करावेत.

१२) इमारतीच्या तळमजल्यावर गाळेधारकाच्या नावे दर्शविलेली टपालपेटी (Letter Box) सुयोग्य ठिकाणी बसविणे बंधनकारक राहील. त्याखेरीज इमारतीचा भाग अथवा पूर्णत्वाचा दाखला दिला जाणार नाही.

१३) विकास आराखड्यातील रस्ता रुंदीने बाधीत क्षेत्र नियमानुसार नगरपालिकेच्या ताब्यात देणे बंधनकारक आहे.

१४) इमारतीच्या सलोह कॉंक्रिट (आर.सी.सी.) कामाच्या सर्व बाजूकरिता आधार व आकारासाठी लाकडाचा वापर करू नये. त्यासाठी लोखंडी आधाराचा वापर करणे बंधनकारक राहील.

१५) इंडियन सोसायटी ऑफ स्ट्रक्चरल इंजिनिअर्स, पुणे ३०. या संस्थेकडील मान्यताप्रत दर्जाच्या स्ट्रक्चरल इंजिनिअरची इमारतीच्या कामासाठी नेमणूक करण्यात यावी, तसेच सदरचे काम स्वीकारल्याबाबतचे स्ट्रक्चरल इंजिनिअर्स यांचे पत्र या विभागाकडे सादर करणे आवश्यक आहे. सदरचे पत्र सादर केल्याशिवाय इमारतीच्या बांधकामास सुरुवात करू नये.

१६) भुखंडाच्या संबंधित सहामाही अखेरचा कर भरल्याचा करसंकलन विभाग म.न.पा. यांचेकडील दाखला / पावती सादर केल्याशिवाय बांधकाम चालू करू नये.

१७) मंजूर रेखांकनातील खुली जागा विकास नियंत्रण नियमावलीप्रमाणे नियम क्र. ११.३.१.५ नुसार तरतुदीचे अधिन विकसीत करणे बंधनकारक आहे. त्याशिवाय भाग अथवा पूर्णत्वाचा दाखला दिला जाणार नाही.

१८) विकास आराखड्यातील रस्ता रुंदीने बाधित क्षेत्र नियमानुसार महापालिकेच्या ताब्यात देणे बंधनकारक आहे. रस्ता रुंदीने बाधित क्षेत्र म.न.पा. चे नावे लावून तसा ७/१२ चा उतारा / सुधारित मालमत्तापत्रक व मोजणी नकाशा, भाग अथवा पूर्ण भोगवटापत्रक घेणेपूर्वी या कार्यालयाकडे सादर करणे आवश्यक आहे. तसेच सदरहू रस्तारुंदीने बाधित क्षेत्राचे खडीमुरुमीकरण महापालिकेच्या विनिर्देशाप्रमाणे अर्जदार यांनी स्वत: करणे आवश्यक आहे. अथवा महानगरपालिकेच्या त्यावेळेच्या प्रचलित दराने खडीमुरुमीकरण खर्च भरणे आवश्यक आहे.

१९) प्रस्तुत प्रकरणातील जागेचा मोजणी नकाशा वहिवाटीनुसार असून हद्दीबाबत वाद निर्माण झालेस त्यास म.न.पा. जबाबदार राहणार नाही. नगरभुमापन कार्यालयाकडील सुधारित मोजणी नकाशा / मालमत्ता पत्रक सादर केल्याशिवाय बांधकामास भाग अथवा पूर्णत्वाचा दाखला देण्यात येणार नाही.

२०) प्रस्तुत प्रकरणातील भुखंडाचे एकत्रिकरण नगर भूमापन कार्यालयाकडून घेऊन, त्याप्रमाणे सुधारित मालमत्तापत्रक व मोजणी नकाशा भोगवटापत्रक घेण्यापूर्वी या विभागाला सादर करणे आवश्यक आहे.

२१) ३०० चौ.मी. वरील क्षेत्राचे भूखंडावरील इमारतींसाठी ( दाट वस्ती क्षेत्र वगळून) रेन वॉटर हार्वेस्टिंग व्यवस्था करणे बंधनकारक आहे.

२२) भूखंडालगतचे पोहोच रस्ता व आसपासचे क्षेत्रातील पाण्याचा निचरा होणे सार्वजनिक आरोग्याचे दृष्टीने आवश्यक आहे. त्यासाठी विकास नियंत्रण नियमावलीतील नियम क्र. ९.१ नुसार योग्य ती उपाय योजना करण्याची सर्वस्वी जबाबदारी विकसक / अर्जदार यांचेवर राहील. अशाप्रकारे पावसाळी पाण्याचा नैसर्गिकरित्या निचरा होण्यास कोणत्याही प्रकारे बाधा येणार नाही. याबाबतची योग्य ती खबरदारी घेणे विकसक / अर्जदार यांचेवर बंधनकारक राहील. याबाबत संबंधित गाळेधारक रहिवासी यांची कोणत्याही प्रकारे तक्रार / हरकत निर्माण झाल्यास त्यांचे संपुर्णत: निराकरण करण्याची जबाबदारी विकसक / अर्जदार यांचेवर राहील. त्याची म.न.पा. स कोणत्याही प्रकारे तोषीस लागू देणार नाही. या अटीवर सदरहू बांधकाम चालू करण्याचे संमतीपत्र मंजूर करण्यात येत आहे.

२३) साईटवर राहणाऱ्या सर्व बांधकाम मजूरांसाठी स्वच्छ पिण्याचे पाणी व स्वच्छतागृहांची सोय उपलब्ध करणे विकसकांवर बंधनकारक आहे.

२४) विकास नियंत्रण नियमावलीनुसार इमारतीमध्ये पुरविण्यात आलेल्या पार्किंगचे क्षेत्र गाळे धारकांसाठी विनामोबदला उपलब्ध करून देणे विकसकांवर बंधनकारक राहील

२५) मा. उपविभागीय अधिकारी / मा. अप्पर जिल्हाधिकारी / मा. जिल्हाधिकारी यांचेकडून वर्ग १ साठी जमिनीची विनिश्चिती नेऊधानंतर व वर्ग २ साठी आवश्यक तो 'ना हरकत दाखला' महानगरपालिकेस सादर केल्याशिवाय जागेवर बांधकामास सुरूवात करणेत येऊ नये.

२६) म्हाडास द्यावयाच्या सदनिका, पुर्णत्वानंतर म्हाडाकडे हस्तांतरीत झाल्यावरच उर्वरीत इमारतींना भाग / संपूर्ण पुर्णत्वाचा दाखला देण्यात येईल.

२७) भुखंडावरील एकूण बांधकाम क्षेत्र (F.S.I. + NON F.S.I.) २०,००० चौ.मी. पेक्षा जास्त होत असल्यास पर्यावरण विभागाचा 'ना हरकत दाखला' सादर केल्याशिवाय बांधकामास सुरुवात करू नये.

२८) यु.एल.सी. बाबत विकसक यांनी सादर केलेले हमीपत्राचे अधिन राहून बांधकाम परवानगी देणेत येत आहे.

उपअभियंता
बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम
नियंत्रण विभाग
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११०१८.

कार्यकारी अभियंता
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत माहितीसाठी : १) मा. जिल्हाधिकारी, पुणे जिल्हा आर.डी. (पुणे) माहितीसाठी

२) सहा. मंडलाधिकारी, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, मनपा / पिंपरी वाघेरे / पिंपरीनगर / चिंचवड / भोसरी / कासारवाडी / आकुर्डी / निगडी प्राधिकरण / सांगवी / पिंपळे गुरव / पिंपळे निलख / पिंपळे सौदागर / वाकड / रावेत / रहाटणी / थेरगाव यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

३) करसंकलन विभाग, मुख्य कार्यालय

४) मा. मुख्याधिकारी, पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास महामंडळ, आगरकर नगर, पुणे ४११ ००१. (MHADA)

**अट क्र. २९ सर्व बांधकाम व्यावसायिक विकसक व जागा मालक यांनी इमारत व इतर बांधकाम कामगार ( रोजगार विनियमन व सेवाशर्थी ) अधिनियम १९९६ व कंत्राटी कामगार ( नियमन व निर्मुलन ) अधिनियम १९७० अनुषंगाने सर्व कामगारांना आरोग्या, सुरक्षितता, व त्यांचे कल्याण (Welfare)विषयक कायद्यातील तरतूदींची पूर्तता करून घेणे बंधनकारक आहे.**

# काही महत्वाच्या सूचना

बांधकामास आरंभ करण्याच्या १० दिवस अगोदर महानगरपालिकेला कळवावे, तसे न केल्यास त्याची जबाबदारी अर्जदारावर राहील.

## जागा वापरण्यास सुरूवात करण्यासंबंधी

१) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियममधील २६३ अन्वये मालकाने बांधकाम पूर्ण होताच महानगरपालिकेच्या कार्यालयामध्ये बांधकाम भोगवटा पत्रक मिळण्याबद्दल अर्ज करणे आवश्यक आहे म्हणजे मा. शहर अभियंतास अगर त्यांनी नेमलेल्या अधिकाऱ्यास जागेची तपासणी करता येईल व जागा वापरण्यास संमती देता येईल. याविरूद्ध वर्तन करणारा संबंधित अर्जदार, महानगरपालिकेच्या दंडात्मक धोरणानुसार दंडास पात्र होईल.

२) एकच गाळा असलेल्या घराच्या पागोळ्या भिंतीच्या बाहेर एका फुटापेक्षा अधिक पुढे नेऊ नयेत. अधिक माळे असल्यास पागोळ्या दीड फुटापेक्षा अधिक पुढे आणू नयेत. पागोळ्यांचे पाणी सडके लगतच्या गटारात उंचावरून पडणार नाही, असे आडवे पन्हाळ व उभी नळी लावून इमारती नजिकच्या गटारात अगर भागात पाणी सोडावे.

३) **प्लॉटमधून जाणाऱ्या पाण्याच्या (विशेषत: पावसाच्या पाण्याचा) नैसर्गिक प्रवाहाचा मार्ग कोणत्याही परिस्थितीत बंद वा कमी करण्याची संमती ह्या या दाखल्याने दिलेली नाही. उंचीप्रमाणे इमारतीस टाक्यापर्यंत पाणी चढविण्यासाठी योग्य पंपाची व हौदाची सोय आवश्यक आहे.**

४) घर बांधणीकरिता लागणारा फाळ अथवा पहाड महानगरपालिकेचा फी देऊन संमती घेतल्याशिवाय महानगरपालिकेच्या हद्दीत ठेवू नये. संमतीवाचून असा पहाड ठेवल्यास तो अपराध होतो.

५) ज्या स्थळाप्रित्यर्थ सरकारास शेतसारा द्यावा लागतो, अशा स्थळाचा वापर घरबांधणीकडे करणे झाल्यास मा. जिल्हाधिकारी, जिल्हा पुणे यांचेकडून बिगरशेती परवानगी घेऊन नंतरच काम करावे. प्रस्तुतपणे मान्यता घेतल्याविना अशा ठिकाणी बांधकाम करू नये.

६) सार्वजनिक मोकळे स्थळ अनाधिकाराने समाविष्ट केले आहे. असे महानगरपालिकेच्या निदर्शनास आल्यास बांधकाम पाडून स्थळ मोकळे करून घेईल. असे करण्यास या संमतीपत्राने बाधा येत नाही आणि अशा वेळी काही हानी झाल्यास महानगरपालिका त्यास जबाबदार राहणार नाही.

७) शेजारच्या लोकांना अथवा इतरांना कामापासून उपसर्ग किंवा कोणत्याही प्रकारचा त्रास अगर हानी पोहोचू नये. त्याविषयी जबाबदारी तुमच्यावर आहे, या संमतीपत्राने दुसऱ्या कोणत्या अधिकारास बाधा येत नाही आणि तुम्ही आपल्या अधिकाराबाहेर कोणतेही काम केल्यास त्याची जबाबदारी तुमच्यावर राहील.

८) हा दाखला महानगरपालिकेच्या सेवकांनी अथवा संरक्षकाने (पोलिसाने) पाहण्यास मागितला असता दाखविला पाहिजे, तसा तो न दाखविल्यास संमतीपत्राविना बांधकाम चालू आहे, असे समजण्यात येईल.

९) दाखला एका वर्षाकरिता अस्तित्वात राहील. पुढे तो आपोआप रद्द झाला असे समजण्यात येईल. सदर संमतीपत्राप्रमाणे काम एक वर्षानंतर करणे असल्यास नवीन सुपरव्हीजन मेमोसह अर्ज करून संमतीपत्राची मुदत वाढवून घेतली गेली पाहिजे व असे संमतीपत्र मिळाल्यानंतर बांधकाम सुरू करावे.

१०) विशेष प्रसंगी महानगरपालिकेने लेखी आज्ञा दिली तर ती पुन्हा मान्य केली पाहिजे, त्यात या संमतीवरून बाधा येत नाही.

११) बांधकाम चालू करण्यापुर्वी महानगरपालिकेकडून नळास पाण्याचा मीटर बसवून घेतला पाहिजे.

१२) पाण्याच्या दाबाविषयी महानगरपालिका जबाबदार नाही, महानगरपालिकेच्या नळास पाण्याचे प्रेशर कमी असल्यामुळे इमारतीच्या वरील मजल्यावर पाणी चढू शकणार नसल्यास संपूर्ण इमारतीस योग्य व पुरेशा प्रमाणात पाणीपुरवठा होण्याच्या दृष्टीने पाण्याचा साठा करण्यासाठी इमारतीभोवतालच्या मोकळ्या जागेत घरमालकास मा. शहर अभियंता अथवा संबंधित अधिकारी सांगतील त्या मापाचा, डिझाईनचा व स्पेसिफिकेशन्सचा हौद बांधावा लागेल व त्या हौदात म्युनिसिपल मेन वॉटर लाईनपासून पाणी आणून हौदात सोडावे लागेल, तसेच सदर हौदाच्या वरील स्लॅब टॉप जमिनीपासून किमान ०.३० मी. वव कमाल ०.४० मी. उंच ठेवण्यात यावा. त्याचप्रमाणे सदर हौदातील पाणी इलेक्ट्रिक पंप बसवून डाऊन टेक पाईपच्या सहाय्याने इमारतीच्या प्रत्येक मजल्यावर पुरेसा पाणीपुरवठा होईल, अशी जरूर ती तजवीज घरमालकास करावी लागेल. सदरच्या टाकीचा आकार मा. शहर अभियंता अथवा संबंधित अधिकारी ठरवतील याप्रमाणे असला पाहिजे. विजेचा पुरवठा घरमालक तयार असताना ही वीज कंपनीकडून मिळत नसल्यास डिझेल ऑईलच्या अगर पेट्रोलच्या सहाय्याने चालणारे इंजिन बसवून पाणी वरच्या मजल्यावर पंप करण्याची व्यवस्था घरमालकास करावी लागेल. या शर्तीप्रमाणे पंप बसवून पाणी पुरवठ्याची तजवीज घरमालकाने केल्याशिवाय बांधकामाचा पूर्णत्वाचा दाखला (कंप्लीशन सर्टिफिकेट) दिला जाणार नाही व इमारतीचा वापर घरमालकास स्वत:साठी करता येणार नाही, अगर दुसऱ्यास वापर करून देता येणार नाही.

१३) महानगरपालिकेच्या लेखी संमतीपत्राशिवाय नवीन विहीर, तलाव किंवा डबके हौद अगर कारंजे खोदण्याचे अगर बांधण्याचे काम करू नये. गलीट्रॅप्स, उघडी गटारे यांना मच्छर प्रतिबंधक व्यवस्था केली पाहिजे. हौदात केरकचरा न जाईल अशी झाकणे व्यवस्थितपणे बसवावीत. त्यास सुलभपणे काढता येईल असे मजबूत कुलूप व किल्ली तसेच ओव्हरफ्लो (वर्कींग) पाईपला

**अट क्र. ३० बांधकाम व्यावसायिक / विकसक / जागामालक यांनी बांधकामावर काम करणाऱ्या कामगार वर्गाचा विमा ( Insurance ) काढणे बंधनकारक असून त्याबाबतचे कागदपत्रे सादर करणे केल्याशिवाय जोते तपासणी दाखला देणेत येणार नाही.**

**अट.क्र.३१ डेंग्यु,चिकन गुन्या, मलेरिया इ. डासांचे वाढीवर नियंत्रण ठेवणे साठी बांधकामाचे साईट वर साठविलेले पाण्याचे टाक्यांवर झाकण असणे बंधनकारक आहे. तसेच साठवलेले पाण्याचे टाकीचे परिसरात साचलेले पाण्याचा निचरा करण्याची व्यवस्था नियमितपणे करणे विकसकावर बंधनकारक राहील. तसेच सदर ठिकाणी नियमितपणे मलेरिया ऑईल, ऍबेट फवारणी इ. डास प्रतिबंधक फवारणी नियमितपणे करणेची जबाबदारी बांधकाम व्यावसायिकांवर राहिल.**

[illegible] पैकी वाळूचे संरक्षण असावे. हद्दीवरील भिंतीवर फुटलेल्या काचांचे तुकडे बसवू नयेत. फ्लशिंग संडासचे अगर इतर संडासाचे जोते नजिकच्या रस्त्याच्या मध्यबिंदूपासून अगर जवळच्या इमारती [illegible] पासून ०.५ मी. उंचीचे असावे.

१४) संबंधित प्लॉटबाबतचा रस्ता, वीज, ड्रेनेज इ. डेव्हलपमेंटस् म्युनिसिपल स्पेसिफिकेशनप्रमाणे तयार केलेला पाहिजेत. अन्यथा सदर डेव्हलपमेंटबाबतच्या तक्रारी ऐकल्या जाणार नाहीत व रस्ते ताब्यात घेतले जाणार नाहीत.

१५) नियोजित बांधकाम रेल्वेच्या हद्दीपासून ३० मीटरच्या आत येत असल्यास रेल्वे खात्याकडील ना हरकत दाखल सादर करावा.

१६) इमारतींच्या पूर्णत्वाचा दाखल्यास अर्ज करते समयी प्रथमतः उर्वरित विकास शुल्क म. न.पा. कोषागारात भरून पावती इकडे सादर करावी. उर्वरित विकास शुल्कावर द. सा. द. शे. १८% दराने कमेन्समेंट सर्टिफिकेटवरील दिनांकपासून, व्याज म. न.पा. कोषागारात भरणे बंधनकारक राहील.

१७) इमारतीमधील उद्वाहकाबाबत सक्षम अधिकारी यांचेकडील चालविण्याची अनुज्ञप्ती, संपूर्ण भोगवटापत्रक घेणेपूर्वी सादर करणे आवश्यक राहील. त्याखेरीज लिफ्टचा वापर करू नये.

१८) मॉल्स थिएटर, मल्टीप्लेक्स, हॉटेल्स, करमणूक केंद्र अशा इमारतींना सुरक्षिततेच्या दृष्टीने एक्स–रे स्कॅनर, डोअर फ्रेम मेटल डिटेक्टर, हॅण्ड हेल्ड मेटल डिटेक्टर, सी. सी. टि. व्ही. कॅमेरे व प्रशिक्षित [illegible] इत्यादी पुरेशी निकासद्वारे ठेवणे अर्जदार / विकासक यांचेवर बंधनकारक राहील.

१९) १ हेक्टर व त्यापेक्षा जास्त क्षेत्र असणाऱ्या निवासी प्रकल्पाचे व मल्टीप्लेक्स, मॉल्स इमारतीमध्ये दर्शनी ठिकाणी मनपाच्या KIOSK/ATM केंद्रासाठी २.४० मी. X २.४० मी. मोजमापाची खोली बांधून मनपाचे ताब्यात विनामूल्य देणे अर्जदार यांचेवर बंधनकारक राहील.

२०) विकास नियंत्रण नियमावलीतील सुधारीत नियम क्र. २३.३ नुसार गेस्ट हाऊस, हॉटेल्स, पोलिस / मेन / आर्मी बरॅक्स, कॅण्टीन्स, प्रयोगशाळा व संशोधन संस्था, हॉस्टेल्स, शाळा, कॉलेजेस व इतर संस्थांना नियमात नमूद केलेल्या क्षमतेची सौर उर्जेवर चालणारी व उष्णजल संयंत्रे (Solar Water Heating System) बसविणे बंधनकारक आहे. त्याशिवाय भाग अथवा पूर्णत्वाचा दाखला दिला जाणार नाही.

२१) १५० चौमी बांधकाम क्षेत्र असणाऱ्या निवासी इमारती व गृहप्रकल्पांसाठी कमीत कमी २५० लि. / बाथरूम व जास्तीत जास्त Roof Area च्या ५०% एवढ्या क्षमतेची सौर उर्जेवर चालणारी उष्णजल संयंत्रे (Solar Water Heating System) बसविणे बंधनकारक आहे. त्याशिवाय भाग अथवा पूर्णत्वाचा दाखला दिला जाणार नाही.

विकसकाचा / मालकाचा पत्ता

मोबाईल क्र. ९५२७७९६२३२३

मे. कोसी लाईफस्पेसेस

पत्ता रेनबो प्लाझा, ऑफिस नं. ४०६, रहाटणी, पुणे - ४११०१७.

बांधकामाच्या जागेचा पत्ता

मौजे. रहाटणी, स.नं. ९९/१/७/७ व ९९/१/७/८, रहाटणी, पुणे - १७